नियमित फौ.प्र.क्र. ९९/२०१८
सरकार वि. शिवाजी
नि.क्र.

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ शपथेवरः–</u>**

माझे नाव – अनिता शिवशंकर ठाकुर,
वय– ४५ वर्षे, कामधंदा – घरकाम,
रा. किल्लारी, ता. औसा, जि. लातूर.

**<u>सरतपास विद्‌वान सरकारी अभियोक्ता श्री एस.एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :–</u>**

आरोपीला मी ओळखते. आरोपी माझे घर शेजारी आहेत. आरोपी मला वारंवार त्रास देत असल्यामुळे मी पोलिस स्टेशनला गेले होते. दि.२३.०८.२०१८ रोजी सकाळी ११.३० ते १२ च्या दरम्यान किल्लारी पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी किल्लारी पोलिस स्टेशनमध्ये बसलेला होता. त्यावेळी मी पोलिसाशी बोलत असताना आरोपीला माझे हाताला धरून तुला झवतो अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर मी पळत पोलिस स्टेशनमध्ये गेले. पोलिसांना बोलावून आणले. त्याठिकाणी पोलिस फौजदार आले आणि आरोपीला म्हणाले की, तु जर पोलिस स्टेशनचे आवारात अशी शिवीगाळ करत असशील तर बाहेर किती देत असशील. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी सेवानिवृत्त पोलिस असल्यामुळे तो मला त्रास देत होता. त्यामुळे मी आरोपीविरूध्द तक्रार दाखल केली. सदरचा तक्रारी अर्ज मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला सदरचा अर्ज दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. तक्रारी अर्जास **निशाणी क्र. पी.१. पी.डब्ल्यू.१** देण्यात येते. सदर तक्रारीचे आधारे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर माझा न्यायालयामध्ये जबाब नोंदविण्यात आला. सदरचा बंद लिफाफा फिर्यादी, सहायक सरकारी अभियोक्ता यांचे समक्ष उघडण्यात आला. आता सदरचा जबाब मला दाखविण्यात आला. सदर जबाबावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.पी.२. पी.डब्ल्यू.२** देण्यात येते. आरोपीला पाहील्यास मी ओळखु शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास संपला.**

**आरोपी व आरोपी तर्फे वकीलांचा वारंवार पुकारा असता गैरहजर, कामकाज तहकुबीचा अर्ज दाखल नाही. सबब आरोपीविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**उलटतपास नाही.**
**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by
NALAWADE SHUBHANGI
HEMANT
Date: 2026.07.21 15:03:37
+0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २१/०७/२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by
NALAWADE SHUBHANGI
HEMANT
Date: 2026.07.21 15:03:40
+0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. २१/०७/२०२६